



दैनिक **अचूक वेध, अचूक बातमी**

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com






वर्ष : ०६ | अंक : १२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.२६ ऑगस्ट २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# मराठवाड्यात भीषण पाणीसंकट! तहानलेल्या गावांसह टँकरच्या संख्येत वाढ

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, छ.संभाजीनगर :** ऑगस्ट महिन्याचा शेवटचा आठवडा सुरू झाला तरी मराठवाड्यात दमदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे. पावसाने मोठा खंड दिल्याने पाण्याचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. सात दिवसांपूर्वी छत्रपती संभाजीनगरसह अन्य तीन जिल्ह्यांतील मिळून एकूण ५१ गावे आणि ४८ वाड्यांना ११४ टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात होता. तर आता तहानलेल्या गावांच्या संख्येसह टँकरच्या संख्येतही वाढ झाली आहे. आजघडीला चार जिल्ह्यांतील तहानलेली १०५ गावे आणि ५५ वाड्यांना १८१ टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे. याशिवाय मराठवाड्यात ४७७ विहिरीही अधिग्रहित करण्यात आल्याची माहिती विभागीय आयुक्तालया प्रशासनातर्फे देण्यात आली. तर उर्वरित चारही जिल्हे




टँकरमुक्त आहेत.

**पावसाच्या मोसमातही टँकरने पाणी पुरवठा**

उन्हाळा सुरू होताच यंदाही मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांतील तहानलेल्या गावात टप्प्याटप्प्याने टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरू झाला. पावसाळा सुरू झाल्यावर टँकरचा प्रश्न निकाली लागेल, अशी अपेक्षा होती. परंतु सर्वदूर अपेक्षित पाऊस झाला नाही आणि जलस्रोत आटलेल्या गावांची तहान भागविण्यासाठी ग्रामस्थांना जूननंतर देखील टँकरचा आधार घ्यावा लागला.

**आतापर्यंत किती टँकरचा पुरवठा सुरु?**

जून, जुलै महिन्यात यात वाढ झाल्याने एकही जिल्हा टँकरमुक्त नव्हता. विशेष म्हणजे जून अखेर छत्रपती संभाजीनगरातील टँकर बंद करण्यात आले होते. परंतु ग्रामस्थांनी मागणी केल्याने टँकर पुन्हा सुरू करावे लागले. १४ जुलैदरम्यान विभागातील तहानलेल्या गावांना ३०३ टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात होता. तर जुलैच्या शेवटच्या आठवड्यात परभणी वगळता विभागातील उर्वरित सात जिल्ह्यांतील एकूण २५७ गावे आणि १३० वाड्यांना ४२८ टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरू होता. जुलै महिन्यात झालेल्या पावसानंतर ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात टँकरच्या संख्येत घट झाली होती. परंतु जुलै महिन्यात काही प्रमाणात दिलासा देणाऱ्या पावसाने ऑगस्ट महिन्यात आतापर्यंत केवळ प्रतीक्षाच करायला लावली. परिणामी, पाण्याचा प्रश्न अधिक तीव्र होत गेल्याचे चित्र आहे.

**कोणत्या जिल्ह्यात किती टँकरने पाणी पुरवठा?**

१८ ऑगस्ट दरम्यान छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड आणि धाराशिव या जिल्ह्यांतील एकूण ५१ गावे, ४८ वाड्यांना मिळून ११४ टँकरने पाणीपुरवठा केला जात होता. तर आजघडीला तहानलेल्या गावांच्या संख्येत दुप्पटीने वाढ झाल्याचे चित्र आहे. सात दिवसांपूर्वी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ११ गावे आणि १० वाड्यांना २५ टँकरने पाणी पुरवठा केला जात होता. सध्या ६२ गावे आणि १७ वाड्यांना ९० टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे. तर जालन्यातील १६ गावे, १३ वाड्यांना २८ टँकरने, बीडमधील २० गावे, २५ वाड्यांना ५४ टँकरने तर धाराशिव जिल्ह्यातील सात गावांना नऊ टँकरद्वारे अशा प्रकारे एकूण १०५ गावे, ५५ वाड्यांना मिळून १८१ टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत असल्याची माहिती विभागीय आयुक्तालयाने दिली.

**४७७ विहिरींचे अधिग्रहण !**

संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन परभणी, हिंगोली, नांदेड हे तीन जिल्हे वगळून मराठवाड्यातील उर्वरित पाच जिल्ह्यांतील खासगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. २४ ऑगस्टच्या अहवालानुसार, एकूण ४७७ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ३१, जालना ३०, बीड १५, लातूर २१७, तर धाराशिव जिल्ह्यातील १८३ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे.

---

# ठाणे FDA ची धडक कारवाई: नवी मुंबईत कोट्यवधींचे दूध भेसळ जाळे उध्वस्त

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२५, ठाणे :** नवी मुंबईतील महापे एमआयडीसी परिसरात सुरू असलेल्या एका मोठ्या दूध भेसळ रॅकेटचा अन्न व औषध प्रशासनाने (FDA) पर्दाफाश केला आहे.

अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्याचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शन व आदेशानुसार, दक्षता विभागाच्या सह-आयुक्त प्रीती टिपरे आणि ठाण्याचे अन्न सह-आयुक्त सचिन जाधव यांच्या निर्देशानुसार ही धडक कारवाई करण्यात आली. १९ ऑगस्ट २०२६ रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ठाणे एफडीएच्या पथकाने महापे येथील मे. पी.के. डेअरीवर अचानक छापा टाकला.

**भेसळीची धक्कादायक पद्धत आणि रंगेहाथ कारवाई...**

छाप्यादरम्यान मे. पी.के. डेअरीच्या आवारात 'एमएच ०४ केयू १६३४' क्रमांकाचा आयशर दूध टँकर उभा असल्याचे आढळले. डेअरी मालक प्रदीप कमलेश यादव याच्या संगनमताने शिवेंद्र श्यामलाल जैस्वाल (वय ३४) हा दुधाची पाकिटे फोडून त्यामध्ये स्किम्ड मिल्क पावडर (SMP) आणि चिलरच्या थंड पाण्याचे मिश्रण टँकरमध्ये ओतताना रंगेहाथ पकडला गेला.

तपासात समोर आले की, १ किलो स्किम मिल्क पावडरमध्ये ८ ते १० लिटर थंड पाणी मिसळून ते प्लंजरच्या साहाय्याने एकजीव केले जात होते. हे भेसळयुक्त दूध गायी-म्हशीचे शुद्ध दूध असल्याचे भासवून ठाणे, ऐरोली, कोपरी, दिघा आणि घणसोली परिसरातील अनेक डेअऱ्यांना पुरवले जात होते.

**लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त व नष्ट**

अन्न सुरक्षा परवाना नसल्यामुळे मे. पी.के. डेअरीचा व्यवसाय तत्काळ बंद करण्यात आला. या संपूर्ण मोहिमेदरम्यान विविध डेअऱ्यांमधून एकूण ४,७१० लिटर भेसळयुक्त व संशयित दूध (किंमत ₹१,८५,७८०/-) जप्त करून सार्वजनिक आरोग्याच्या सुरक्षेसाठी नष्ट करण्यात आले. याशिवाय १२९.५ किलो पनीर (किंमत ₹४५,२८०/-), ४७३ किलो स्किम्ड मिल्क पावडर (किंमत ₹१,६०,८२०/-) आणि ८८.४ किलो क्रीम (किंमत ₹३०,९४०/-) असा एकूण लाखो रुपयांचा साठा जप्त करण्यात आला.

तपासणीदरम्यान मे. पी.के. डेअरीतून ३९३ लिटर म्हशीचे आणि ३६८ लिटर गायीचे असे एकूण ७६१ लिटर दूध (किंमत ₹४०,५५८/-) जागेवरच नष्ट केले गेले.

पुरवठादार मे. भास्कर डेअरी (महापे) येथून ५४८ किलो संशयित पावडर व पनीर (किंमत ₹१,८३,३२०/-) जप्त करून परवाना निलंबित करण्यात आला.

मे. नारायण डेअरी (रबाळे) कडील प्रयोगशाळा अहवाल नसलेला ३,६४८ लिटर पाश्चराईज्ड स्किम्ड दुधाचा साठा (किंमत ₹१,२४,०३२/-) नष्ट करण्यात आला, तर मे. फत्तेसिंगराव नाईक सहकारी दूध संघाकडून ८८.४ किलो क्रीम जप्त करण्यात आले.

**१५ जणांवर गुन्हा दाखल...**

या प्रकरणी तुर्भे पोलीस ठाण्यात २२ ऑगस्ट २०२६ रोजी प्रथम खबर अहवाल (FIR क्र. ४३५/२०२६) दाखल करण्यात आला असून संबंधित पेढ्यांचे अन्न परवाने रद्द करण्याची प्रक्रिया सुरू आहे.



या गुन्ह्यामध्ये शिवेंद्र श्यामलाल जैस्वाल, प्रदीप कमलेश यादव, भास्कर संतु पिलानी यांच्यासह मे. महाराज डेअरी (ऐरोली), मे. विजय डेअरी (घणसोली), मे. शिवकैलास डेअरी (ऐरोली), मे. रूपसागर डेअरी (ऐरोली), मे. दिनेश डेअरी (ऐरोली), मे. बालाजी डेअरी (ऐरोली), मे. शुक्लम् डेअरी (दिघा), मे. श्रीराम डेअरी (कोपरी, ठाणे), मे. वासुदेव डेअरी (कोपरी, ठाणे), मे. राधाकृष्ण डेअरी (कोपरी, ठाणे), मे. जनम डेअरी (साकेत, ठाणे) आणि मे. देवनारायण डेअरी (आझाद नगर, ब्रह्मांड, ठाणे) या १५ व्यक्ती व पेढ्यांचा समावेश आहे.

ही कारवाई कोकण विभागाचे सह-आयुक्त (अन्न) अजित मैत्रे, अन्न सुरक्षा अधिकारी विक्रम निकम, प्रशांत पवार, उत्तरेश्वर बडे, माणिक जाधव व गुप्तवार्ता पथकाने यशस्वीरित्या पूर्ण केली.

नागरिकांना कोणत्याही अन्नपदार्थात भेसळीचा संशय आल्यास प्रशासनाच्या १८०० २२२ ३६५ या टोल-फ्री क्रमांकावर तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन सह-आयुक्त डॉ. सचिन जाधव यांनी केले आहे.

---

## गोवंश तस्करीचा डाव उधळला ; ४ बोलेरो पिकअपसह १२ गोवंश जप्त...

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२५, चंद्रपूर :** भद्रावती पोलीस ठाणे हद्दीतून गोवंशाची अवैध व अमानुष पद्धतीने वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती मिळताच भद्रावती पोलिसांनी धडाकेबाज कारवाई करत चार बोलेरो पिकअप वाहनांना पाठलाग करून अडविले. या चारही वाहनांमधून प्रत्येकी तीन, असे एकूण १२ गोवंश ताब्यात घेण्यात आले असून, चार वाहनांसह एकूण ₹२४ लाख १९ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दि. २५ ऑगस्ट रोजी भद्रावती पोलीस ठाण्यात डीवायएसपी सचिन खेत्रे हे प्रभारी अधिकारी म्हणून उपस्थित असताना गुप्त बातमीदारामार्फत गोवंशाची संशयास्पद वाहतूक सुरू असल्याची माहिती मिळाली. माहितीची गांभीर्याने दखल घेत डीवायएसपी सचिन खेत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी मांगली गावाच्या दिशेने नाकाबंदी केली.

दरम्यान, संशयित बोलेरो पिकअप वाहने पोलिसांच्या निदर्शनास येताच चालकांनी वाहने पुढे नेऊन पोलिसांच्या तावडीतून निसटण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी शिताफीने पाठलाग करून चारही वाहने अडवून ताब्यात घेतली.

**प्रत्येक वाहनात ३ गोवंश :** पंचांसमक्ष वाहनांची तपासणी केली असता प्रत्येक वाहनात तीन गोवंश आढळून आले. जनावरांच्या वाहतुकीदरम्यान आवश्यक सुरक्षिततेच्या उपाययोजना करण्यात आल्या नसल्याचे प्रथमदर्शनी आढळून आले. तसेच गोवंशाच्या मालकी व वाहतुकीबाबत आवश्यक वैध कागदपत्रे उपलब्ध नसल्याचेही पोलिसांच्या तपासात निदर्शनास आले.

या प्रकरणी शुभम भाऊराव वनवे (३०), साहिल ईश्वर बनसोडे (२२), राकेश आनंदाराव उताने (३६) तिघेही रा. लखेवेर, ता. जि. भंडारा, तसेच अजित दादाजी बारतीने (२१), रा. आष्टी काकडे, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. सदर कारवाईत चार बोलेरो पिकअप वाहनांची अंदाजे किंमत ₹२२ लाख, तर १२ गोवंशांची अंदाजे किंमत ₹२ लाख १९ हजार, असा एकूण ₹२४ लाख १९ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जप्त गोवंशांची पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून तपासणी करण्यात येत असून, त्यांच्या आरोग्यस्थितीबाबत आवश्यक प्रमाणपत्र घेण्याची प्रक्रिया सुरू आहे.सदर प्रकरणी प्राण्यांना क्रूरतेपासून प्रतिबंध अधिनियम, १९६० मधील कलम ११(१)(डी), महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, १९७६ तसेच भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील लागू तरतुदींनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. गोवंशांची वाहतूक, मालकी, वाहतुकीचा उद्देश तसेच वाहनमालक किंवा अन्य व्यक्तींचा सहभाग याबाबत पुढील तपास सुरू आहे.

गोवंशाची अवैध वाहतूक अथवा जनावरांना अमानुषपणे वाहनांमध्ये कोंबून वाहतूक करणाऱ्यांची गय केली जाणार नाही. तपासात वाहनमालक, गोवंशाचे मालक, खरेदी-विक्री करणारे किंवा मध्यस्थांचा सहभाग आढळल्यास त्यांच्याविरुद्धही कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

---

# महामार्गावर प्रवाशांना लिफ्ट देऊन लुटणारी आंतरराज्यीय टोळी गजाआड

**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.२५, शिरपूर (धुळे) :** शिरपूर मुंबई-आग्रा महामार्गावर प्रवाशांना आपल्या वाहनात लिफ्ट देण्याच्या बहाण्याने बसवायचे आणि नंतर त्यांची रक्कम लुटून पसार व्हायचे, असा प्रताप करणाऱ्या एका सराईत आंतरराज्यीय टोळीचा धुळे स्थानिक गुन्हे शाखेने मुसक्या आवळल्या आहेत. या टोळीकडून गुन्ह्यात वापरलेली इको कार आणि रोख रक्कम असा एकूण ५ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, या कारवाईमुळे नाशिक जिल्ह्यातील आणखी एका गुन्ह्याची उकल झाली आहे.

**असा घडला होता प्रकार**

दिनांक २२ जुलै रोजी सकाळी सव्वानऊ वाजेच्या सुमारास मुंबई-आग्रा महामार्गावरील शिरपूर फाट्यावरील महाजन हॉटेलजवळ हा प्रकार घडला होता. फिर्यादी प्रशांत शांताराम पाटील रा. बोराडी हे उभे असताना एका इको कारमधून आलेल्या तीन अज्ञात व्यक्तींनी त्यांना लिफ्ट देण्याच्या बहाण्याने गाडीत बसवले. काही अंतर पुढे गेल्यावर या भामट्यांनी प्रशांत पाटील यांच्या खिशातील १ लाख रुपये लबाडीने काढून घेतले आणि त्यांना वाहनातून खाली उतरवून पळ काढला. या घटनेनंतर शिरपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

**तांत्रिक विश्लेषणातून लागला माग**

या गंभीर गुन्ह्याचा समांतर तपास धुळे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे यांच्याकडे होता. त्यांनी तांत्रिक विश्लेषण आणि पारंपारिक तपासाची सांगड घालत या गुन्ह्यामागे एका तीन सदस्यीय टोळीचा हात असल्याचे निष्पन्न केले. तपासात अशी खात्रीशीर माहिती मिळाली यातील मुख्य आरोपी गुजरात मधील सुरत येथे लपून बसला आहे, तर उर्वरित दोन आरोपी त्याच इको वाहनाने पुढील गुन्हा करण्यासाठी नंदुरबारच्या दिशेने गेले आहेत. वेळेचे गांभीर्य ओळखून पोलीस निरीक्षक वारे यांनी तात्काळ दोन विशेष पथके तयार केली आणि त्यांना सुरत व नंदुरबार येथे रवाना केले.

**नंदुरबार ते सुरत अशी झाली अटक**

दिनांक २३ ऑगस्ट रोजी पोलिसांनी दोन्ही ठिकाणी यशस्वी सापळा रचला.

मोहसीन ऊर्फ नववा हुसैन शेख रा. दिंडोली, सुरत या मुख्य आरोपीला सुरत येथून बेड्या ठोकण्यात आल्या.तर शोएब अब्दुल मजीद अकबानी रा. सुरत आणि अशरफ खान रुस्तम खान रा. जुना आवास, सुरत या दोन आरोपींना नंदुरबार येथून इको गाडीसह ताब्यात घेण्यात आले.




या तिघांची कसून चौकशी केली असता त्यांनी शिरपूर येथील गुन्ह्याची सकबुली दिली.

**नाशिकमधील गुन्ह्याचीही उकल**

केवळ शिरपूरच नव्हे, तर या टोळीने वाडीवऱ्हे ता. इगतपुरी जि. नाशिक येथेही अशाच प्रकारे प्रवाशांना लिफ्ट देऊन त्यांच्यासोबत जबरी चोरी केल्याची कबुली दिली आहे. पकडण्यात आलेले तिन्ही आरोपी हे सराईत गुन्हेगार असून त्यांच्यावर यापूर्वी गंभीर गुन्हे दाखल आहेत.

मोहसीन शेख याच्यावर कापोदरा (सुरत) येथे भादंवि ३९४, ३४ नुसार गुन्हा दाखल आहे.

शोएब अकबानी याच्यावर मालेगाव येथे भादंवि ३७९, ३४ अन्वये गुन्हा दाखल आहे.

अशरफ खान याच्यावर सलबतपुरा (सुरत) येथे जुगार कायद्यानुसार गुन्हा दाखल आहे.

**पोलिसांनी जप्त केलेला मुद्देमाल**

५ लाख रुपये किमतीची गुन्ह्यात वापरलेली मारुती सुझुकी इको कार क्रमांक जीजे १६ बीजी ९५३५ व ४० हजार रुपये रोख असा एकूण ५ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदर कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद आणि अप्पर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे, सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक ढोके, पोलीस उपनिरीक्षक अमरजित मोरे, प्रशांत चौधरी, चेतन बोरसे, संतोष हिरे, राहुल गिरी, हर्षल चौधरी, कमलेश सूर्यवंशी, विनायक खैरनार व जगदीश सूर्यवंशी यांच्या पथकाने केली आहे.




## पवित्र कुंभ; आरोग्याची उपेक्षा!

'तहान लागल्यावर विहीर खणणे' या म्हणीचा प्रत्यय नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभपर्वाच्या निमित्ताने येत आहे. बहुतांश रस्ते एकाच वेळी खोदून ठेवल्याने दोन्ही शहरांत गोंधळ उडाला आहे. हजारो कोटी रुपयांच्या निविदा केवळ रस्त्यांसाठी काढल्या असताना, कुंभमेळ्यातील आरोग्य सुविधांकडे अद्याप प्रशासनाचे फारसे लक्ष गेलेले दिसत नाही. त्र्यंबकेश्वर उपजिल्हा रुग्णालयाचे उदाहरण त्यासाठी पुरेसे ठरावे. कुंभाचे ध्वजारोहण अवघ्या दोन महिन्यांवर आले असताना, प्रशासनाने ऐन वेळी या रुग्णालयाच्या स्थलांतराचा घाट घातला आहे. त्यासाठी पर्यायी जागा अद्यापही निश्चित झालेली नाही. स्थलांतरादरम्यान गावातील रुग्णांचे काय करणार, याचे उत्तर द्यायला कोणी तयार नाही.

जेमतेम पाच-सात लाख लोकांची क्षमता असलेल्या त्र्यंबकमध्ये कुंभमेळ्यात लाखो-कोट्यवधी भाविक कसे मावणार, याबद्दलही 'तेरी भी चूप, मेरी भी चूप' आहे. पर्वणीकाळात चेंगराचेंगरी वा इतर कटू प्रसंग गुदरल्यास उपचारांचे काय, या प्रश्नावर आरोग्यमंत्री मोघम उत्तरे देतात. 'शासकीय रुग्णालयांची कामे पूर्ण करू. चारशे ते पाचशे खाटांच्या रुग्णालयाचे लोकार्पण करू,' असे ते म्हणतात. कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह अडीचशे कोटी रुपयांचा आराखडा तयार असल्याचा दावा करतात. प्रत्यक्षात सध्या पन्नास खाटांच्या रुग्णालयाचा वांधा झाला आहे. कुंभमेळामंत्री एकीकडे 'एअर ॲम्बुलन्स'च्या गप्पा करत असताना, सांगाडारूपी उरलेल्या रुग्णालयांकडे त्यांचे लक्ष जात नाही. प्रभू श्रीरामाच्या भूमीत येताना लोकांनीही 'रामभरोसे'च यावे, असे तर यातून सुचवायचे नाही ना?

सन २००३च्या कुंभमेळ्यात नाशिकच्या सरदार चौकात चेंगराचेंगरी झाली, तेव्हा नाशिक जिल्हा रुग्णालयाचे भाग्य उजळले होते. महापालिकेची काही रुग्णालयेही काही प्रमाणात अद्ययावत झाली होती. मात्र, त्यालाही आता २३ वर्षे उलटली. त्या तुलनेत कुंभमेळ्याचा आवाका कित्येक पटीने वाढला आहे. काही कोटी वगैरे असू द्या; काही लाख लोक येणार असतील (अर्थात, प्रशासनाने त्यांना येऊ दिल्यास), तर त्यांच्यासाठी हजार-पंधराशे खाटा कशा व कुठवर पुरणार? सध्या जिल्ह्यातील सर्व सरकारी रुग्णालये मिळून जेमतेम एकवीसशे खाटांची क्षमता आहे. लसीकरणाचा मुद्दाही दुर्लक्षित करता येणार नाही.

सत्तरच्या दशकात रोगराई पसरल्याने लसीकरणाशिवाय भाविकांना कुंभाची परवानगी नाकारण्यात आली होती. कदाचित हंगामी व्यवस्था वा खासगी रुग्णालये अधिग्रहित करण्यावर आताच्या यंत्रणेची भिस्त असावी. परंतु, त्याच्या पूर्वतयारीबाबतही आनंदीआनंदच दिसतो. आरोग्य क्षेत्र अद्ययावत करून त्याला आजमावून पाहण्याची, सेवाभाव दाखविण्याची संधी आपण दवडत आहोत, हेही लक्षात घेतले जात नाही. सरकारी रुग्णालये भ्रष्टाचाराने पोखरली गेली असल्याने संबंधितांनी किमान पापमुक्तीची संधी म्हणून तरी त्याकडे बघावे.

कुंभमेळ्याच्या निमित्ताने सरकारी रुग्णालयांचे नशीब फळफळले तर गरिबांची कायमची सोय होईल. राज्यात गावोगावी अशी बरीच रुग्णालये अंथरुणाला खिळून आहेत. त्यांच्या दुर्दैवाने तेथे कुंभमेळा नाही. परंतु, जेथे आहे तेथे तरी कुठे दिवे लागले आहेत? प्रत्येक महत्त्वाच्या धार्मिक स्थळावर किमान शंभर खाटांचे सरकारी वा धर्मादाय रुग्णालय का नाही, हा प्रश्नही कोणाला पडत नाही. शिर्डी, शेगावसारख्या ठिकाणी ते असल्याने देशभरातून येणाऱ्या गरजूंची सोय झाली व तेथील स्थानमहात्म्य वाढण्यास मदतच झाली. नाशिक-त्र्यंबकमध्ये तसे घडल्यास हा महाकुंभ खऱ्या अर्थाने पवित्र अन् गौरवास्पद म्हटला जाईल. तो आरोग्यकुंभ म्हणून ओळखला जाईल. धर्म-अध्यात्माचा हा मेळा जगभरासाठी आदर्श ठरू शकेल, भारतीय संस्कृती-परंपरेच्या लौकिकातही भर पडेल. अर्थात, असे व्हावे अशी सध्या केवळ आशाच बाळगता येईल. बाकी प्रशासनाच्या हाती!

**- संपत थेटे**

# बांगलादेश, सौदी-तुर्की-पाकिस्तानच्या लष्करी आघाडीत, सहभागी होण्याचा प्रयत्न; भारताने सावध राहण्याची गरज

बांगलादेशातील बदलत्या राजकीय परिस्थितीचा परिणाम आता केवळ त्या देशाच्या अंतर्गत राजकारणापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर त्याचे पडसाद दक्षिण आशियातील सामरिक आणि राजनैतिक समीकरणांवरही उमटताना दिसत आहेत. बांगलादेश पाकिस्तान, सौदी अरेबिया आणि तुर्की यांच्यासोबत संरक्षण किंवा लष्करी सहकार्य वाढविण्याच्या दिशेने विचार करीत असल्याच्या चर्चेने भारताच्या चिंतेत निश्चितच भर पडली आहे. भारताच्या दृष्टीने ही बाब केवळ एका शेजारी देशाच्या परराष्ट्र धोरणातील बदल म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही. कारण बांगलादेशाचे भौगोलिक स्थान भारताच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे.

भारत आणि बांगलादेश यांच्यात ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि आर्थिक संबंध आहेत. दोन्ही देशांची मोठी सीमा एकमेकांना जोडते. व्यापार, वाहतूक, ऊर्जा, जलव्यवस्थापन, सुरक्षा आणि सीमावर्ती भागातील सहकार्य अशा अनेक क्षेत्रांत दोन्ही देशांचे हितसंबंध परस्परांशी जोडलेले आहेत. त्यामुळे बांगलादेशच्या परराष्ट्र धोरणात भारतविरोधी कल वाढणे ही निश्चितच चिंतेची बाब आहे.

विशेषतः पाकिस्तान आणि तुर्की यांच्याशी बांगलादेशाचे वाढते संरक्षण सहकार्य भारतासाठी संवेदनशील विषय ठरू शकतो. पाकिस्तानचा भारताशी असलेला दीर्घकालीन संघर्ष सर्वश्रुत आहे. अशा परिस्थितीत पाकिस्तानसोबत बांगलादेशाने संरक्षणविषयक जवळीक वाढविल्यास दक्षिण आशियातील सामरिक समीकरण अधिक गुंतागुंतीचे होऊ शकते. तुर्कीचेही विविध आंतरराष्ट्रीय प्रश्नांवरील स्वतंत्र धोरण आणि वाढता सामरिक प्रभाव लक्षात घेता या संभाव्य समीकरणाकडे भारताला अत्यंत बारकाईने पाहावे लागेल.

मात्र या परिस्थितीकडे केवळ संघर्षाच्या चष्म्यातून पाहणे योग्य ठरणार नाही. भारताने भावनिक प्रतिक्रिया देण्याऐवजी मुत्सद्देगिरी, संवाद आणि राष्ट्रीय हित यांचा समतोल साधणे आवश्यक आहे. बांगलादेशातील सरकार कोणतेही असो, तेथील जनतेशी भारताचे संबंध कायम राहिले पाहिजेत. सरकारे बदलतात; मात्र शेजारी देशांमधील संबंध दीर्घकाळ टिकणारे असतात.

भारताने बांगलादेशासोबत आर्थिक आणि लोकसंपर्काचे संबंध अधिक मजबूत करण्यावर भर दिला पाहिजे. व्यापार वाढविणे, सीमावर्ती भागातील विकासाला चालना देणे, ऊर्जा सहकार्य वाढविणे, वाहतूक आणि संपर्क व्यवस्था सुधारणे तसेच शिक्षण आणि सांस्कृतिक देवाणघेवाण वाढविणे यामुळे दोन्ही देशांमधील परस्परावलंबित्व अधिक दृढ होईल. मजबूत आर्थिक संबंध हे अनेकदा राजकीय मतभेदांवर प्रभावी पूल ठरतात.

त्याचबरोबर भारताने आपल्या सीमासुरक्षेबाबत कोणतीही तडजोड करता कामा नये. बेकायदेशीर घुसखोरी, तस्करी, दहशतवादी कारवायांना मदत करणारे नेटवर्क आणि सीमावर्ती भागातील अस्थिरता यावर कठोरपणे लक्ष ठेवणे आवश्यक आहे. शेजारी देशाशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवणे आणि राष्ट्रीय सुरक्षेचे संरक्षण करणे या दोन्ही गोष्टी एकाच वेळी शक्य आहेत.

बांगलादेशच्या परराष्ट्र धोरणातील बदल हा तेथील अंतर्गत राजकीय परिस्थितीशीही संबंधित असू शकतो. त्यामुळे प्रत्येक विधान किंवा राजनैतिक हालचालीचा अर्थ भारतविरोधी कट म्हणून लावण्यापेक्षा त्यामागील व्यापक राजकीय आणि सामरिक कारणांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. भारताने परिस्थितीवर बारकाईने नजर ठेवत योग्य वेळी योग्य राजनैतिक पावले उचलली पाहिजेत.

दक्षिण आशियात शांतता आणि स्थैर्य टिकविण्यासाठी भारताची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. भारत हा या प्रदेशातील मोठी आर्थिक आणि सामरिक शक्ती असल्याने त्याच्याकडून संयमित आणि दूरदृष्टीची अपेक्षा आहे. शेजारी देशांना दूर लोटण्याऐवजी त्यांना विश्वासात घेणे, आर्थिक विकासाच्या माध्यमातून संबंध मजबूत करणे आणि सुरक्षा विषयांवर स्पष्ट भूमिका घेणे हीच दीर्घकालीन रणनीती ठरू शकते.

बांगलादेश पाकिस्तान, तुर्की किंवा इतर कोणत्याही देशासोबत सहकार्य करतो म्हणून भारताने घाबरून जाण्याचे कारण नाही; परंतु त्यातून भारताच्या सुरक्षेला किंवा हितसंबंधांना धोका निर्माण होण्याची शक्यता असेल तर त्याकडे दुर्लक्षही करता येणार नाही. मैत्रीचा हात पुढे ठेवतानाच सुरक्षेची ढाल मजबूत ठेवणे, हीच भारताच्या परराष्ट्र धोरणाची खरी कसोटी आहे.

आजच्या बदलत्या जागतिक राजकारणात कोणताही देश कायमचा मित्र किंवा कायमचा शत्रू नसतो; राष्ट्रीय हित हेच परराष्ट्र धोरणाचे अंतिम सूत्र असते. त्यामुळे बांगलादेशाशी संबंधांमध्ये भारताने भावनिकतेपेक्षा व्यवहार्यता, संघर्षापेक्षा संवाद आणि दबावापेक्षा प्रभावी मुत्सद्देगिरीला प्राधान्य दिले पाहिजे. शेजारी देश स्थिर, शांततापूर्ण आणि भारताशी सहकार्य करणारा राहणे हेच भारताच्या दीर्घकालीन हिताचे आहे.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# रक्षाबंधन आणि बहिणींची सुरक्षा !



रक्षाबंधन सण अगदी तोंडावर आल्याने बाजारपेठा विविध रंगांच्या राख्यांनी सजल्या आहेत. हिंदू संस्कृतीत भाऊ-बहिणीचे नाते हे अत्यंत पवित्र मानले जाते. रक्षाबंधनाच्या दिवशी बहीण भावाच्या मनगटाला राखी बांधून त्याच्याकडून तिच्या रक्षणाचे वचन घेते. भाऊसुद्धा 'प्राणपणाने तुझे रक्षण करेल', असे बहिणीला वचन देतो. या दिवशी बहीण आपल्या भावाच्या उत्तम आरोग्यासाठी आणि समृद्धीसाठी देवाकडे प्रार्थना करते तर भाऊसुद्धा बहिणीच्या दीर्घायुष्यासाठी, सुखसंपन्नेतेसाठी आणि संरक्षणासाठी देवाकडे याचना करतो. सहस्रो वर्षांची परंपरा लाभलेल्या या सणाला भाऊ बहिणीतील अतुल प्रेमाची, आदराची आणि निष्ठेची जोड आहे. द्वापारयुगात एकदा भगवान श्रीकृष्णाच्या मनगटाला जखम होऊन त्यातून रक्त वाहू लागले, हे पाहताच द्रौपदीने क्षणाचाही विलंब न करता नेसलेल्या भरजरी वस्त्राच्या टोकाचा एक तुकडा फाडून श्रीकृष्णाच्या मनगटाला बांधला. तेव्हापासून बहीण भावाच्या पवित्र नात्याचा हा उत्सव साजरा केला जाऊ लागला. रक्षाबंधनाच्या दिवशी सूर्योदयी स्नान करतात. उपकर्म करून ऋषींचे तर्पण करतात अपराह्णकाळीं राखी तयार करतात. तांदूळ, सोने आणि पांढऱ्या मोहऱ्या एकत्र करून त्यांची पुरचुंडी तयार केली जाते, जिला राखी म्हटले जाते. या राखीचे पूजन केले जाते . त्यानंतर 'येन बद्धो बली राजा दानवेन्द्रो महाबलः । तेन त्वामपि बध्नामि रक्षे मा चल मा चल ।।' हा मंत्र म्हणून बहीण भावाला ही राखी बांधते. 'महाबली दानवेंद्र बळी राजा जिने बद्ध झाला, त्या रक्षेने मी तुलाही बांधतो. हे रक्षे, तू चलित होऊ नकोस' असा या मंत्राचा अर्थ आहे. कालागणिक हा सण साजरा करण्याची पद्धत जरी बदलली असली, तरी सणामागील उद्देश मात्र तोच आहे. आज आपला भाऊ साता समुद्रापार जरी असला तरी बहीण त्याला राखी पाठवायला विसरत नाही. ज्या बहिणींना सख्खा भाऊ नसतो ती अन्य पुरुषाला किंवा चंद्राला आपला भाऊ मानते आणि हा सण साजरा करते. 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः। यात्रेतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः।' अर्थात ज्या कुळामध्ये स्त्रीची पूजा, म्हणजेच तिचा मान-सन्मान होतो, त्या कुळात सुशील आणि गुणसंपन्न संतती जन्माला येते. ज्या ठिकाणी स्त्रीचा अपमान होतो त्या कुळाची प्रगती खुंटते हा संस्कार हिंदू धर्मग्रंथांनी केल्यामुळे हिंदू धर्मात स्त्रीला नेहमीच आदराचे आणि सन्मानाचे स्थान दिले गेले आहे. रक्षाबंधन हा सणसुद्धा स्त्रीच्याप्रती आदर व्यक्त करणाराच आहे. आठशे वर्षांपूर्वी संत ज्ञानेश्वरांनी पसायदानातून विश्वबंधुत्वाची शिकवण दिली आहे. लहानपणी शाळेतसुद्धा सारे भारतीय माझे बांधव आहेत, अशी प्रतिज्ञा करूनच प्रत्येक जण मोठा झाला आहे. दुर्दैवाने या सर्वांचा आजच्या तरुण वर्गाला विसर पडला आहे. आजमितीला देशासह राज्यातील स्त्रियांवरील अत्याचारांच्या घटनांमध्ये कमालीची वाढ झाली आहे. दोन वर्षांच्या बालिकेपासून ८० वर्षांची वृद्धाही नराधमांच्या वासनेतून सुटत नाही. आपल्या बहिणीला रक्षणाचे वचन देणारा भाऊ अन्य स्त्रीमध्ये आपल्या भगिनींचे रूप का पाहू शकत नाही. आपल्या संस्कृतीचा आपल्यालाच विसर पडू लागला आहे का ?

छत्रपती शिवाजी महाराज हे आजच्या पिढीचे दैवत आहेत, आजचा तरुण एकवेळ आईवडिलांचा अपमान सहन करेल; मात्र छत्रपती शिवाजी महाराजांविषयी अपशब्द काढणाऱ्याची जीभ छाटल्याशिवाय राहणार नाही. आज मंदिरातील देवांच्या मूर्ती शाबूत आहेत ते छत्रपती शिवाजी महाराजांमुळेच. पाच बलाढ्य पातशाह्यांविरोधात लढून महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले. रयतेला भयमुक्त केले. व्यापाराचे निमित्त करून सत्ताकारणात ढवळाढवळ करू पाहणाऱ्या इंग्रजांना त्यांची जागा दाखवून दिली. आपल्या अधिकाराचा गैरवापर करून महिलेवर अत्याचार करणाऱ्या रांझे पाटलाचा चौरंगा करून छत्रपती शिवाजी महाराजांनी एक आदर्श स्वराज्यासमोर निर्माण केला. स्वराज्यातील स्त्रीकडे वाकड्या नजरेने पाहणाऱ्याची काय स्थिती होऊ शकते याचे उदहारण त्यांनी जगासमोर उभे केले. त्यानंतर कोणाची हिम्मत झाली नाही स्वराज्यातील स्त्रियांकडे वासनेच्या नजरेने पाहण्याची. शिवाजी महाराजांना देव मानणारा आजचा तरुण लुटीच्या मुद्देमालासह आलेल्या कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला सन्मानाने स्वगृही पाठवणाऱ्या शिवाजी महाराजांची वृत्ती अंगी केव्हा बाणवणार आहे ? स्वराज्यातील बाया बापड्यांच्या रक्षणासाठी स्वतःचे प्राण धोक्यात घालणाऱ्या संभाजी महाराजांचा आदर्श आजचा तरुण कधी अंगिकारणार आहे ? जो देश आपल्या इतिहासातून धडे घेत नाही तो देश रसातळाला जातो अशी एक म्हण आहे. आजच्या तरुणांची स्थितीही काहीशी अशीच झाली आहे. आज तरुणांना गरज आहे इतिहासातील थोर पुरुषांच्या चरित्रातून धडे घेऊन आपले चारित्र्य घडवायची. आजचे सरकार राज्यातील भगिनींना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने अंतर्गत दरमहा १५०० रुपये देत आहे ; मात्र बहिणींना केवळ आर्थिक साहाय्य करणे एव्हढेच भावाचे कर्तव्य नसून बहिणीच्या रक्षणाची सर्वस्वी जबादारी घेणे हे भावाचे प्रमुख दायित्व आहे. राज्याची परिस्थिती पाहता राज्यातील भगिनींना आर्थिक मदतीपेक्षा सुरक्षिततेचीच अधिक आवश्यकता आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील महिलेवर अत्याचार करणाऱ्या रांझे पाटलाचे हात पाय कलम करून वासनांधांवर अंकुश निर्माण केला होता. महाराष्ट्रातही अशा कठोर कायद्याची आज नितांत गरज आहे. स्त्री अत्याचाराच्या विरोधात ज्यावेळी कठोर कायदे अमलात येऊन त्यांची प्रामाणिकपणे अंमलबजावणी केली जाईल, ज्या दिवशी स्त्री अत्याचाराचा आलेख घसरू लागेल आणि ज्या दिवशी एका स्त्रीच्या रक्षणासाठी हजारो मनगटे पुढे सरसावतील त्या दिवशी रक्षाबंधनाचा उद्देश खऱ्या अर्थाने साध्य झाला असे म्हणता येईल.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## काय (दा)

म्हणे हवा हमी भाव
चालते माझीआबदा
डोक्यां घेऊन फिरा
राजकर्त्यांच्या शब्दां

आज यास उद्या त्या
नेहमी रडवतो कांदा
अडचणीवेळी नडतो
बरोबर करतो वांदा

गोदामात सडे कांदा
आतबट्ट्याचा धंदा
सोक्ष मोक्ष लावणारे
तयार द्यायला खांदा

हेडकाळतोयं बाजार
ना कळे काय इरादा
कुणी किती लुटायचे
कसली नाही मर्यादा

कोण ऐकेलंआक्रोश
काना भक्कम पडदा
सामान्य मधे पिचला
ठेवला ना आडपडदा

रक्ताळला सात बारा
लावतो मागे तकादा
सोडवा जंजाळातूनि
मसीहा हवा एखादा

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# रक्षाबंधनाचे आध्यात्मिक वैशिष्ट्य !

अध्यात्मशास्त्रानुसार जीवांमधील देवाण घेवाण हिशोब संपवून ईश्वरप्राप्ती करून घेण्यासाठी आत्म्याला मानवी जन्म लाभतो. मात्र मानवी जन्मात केलेल्या चांगल्या वाईट कर्मामुळे त्याला पाप-पुण्य लाभते आणि त्याचे फळ भोगण्यासाठी त्याला पुन्हा पुन्हा जन्म घ्यावा लागतो. मानवी जन्मात मिळणारे नातेवाईक, आप्तेष्ट, शेजारी-पाजारी, मित्र मंडळी हा सर्व गोतावळा आपल्याभोवती निर्माण होण्यामागे त्यांच्याशी गेल्या अनेक जन्मांचे आपल्याशी असलेले देवाण घेवाण हिशोब पूर्ण करणे हेच कारण असते. बहीण-भावाचे नाते निर्माण होण्यामागेही हेच कारण आहे. रक्षाबंधन आणि भाऊबीज या सणांमागे पौराणिक कथांचा आधार असला तरी या दोघांतील देवाण घेवाणीचा हिशोब पूर्ण करण्यासाठीच रक्षाबंधन, भाऊबीज या सणांची निर्मिती झाली आहे. स्थूल रूपाने रक्षाबंधन हे जरी बंधन वाटत असले, तरी सूक्ष्म रूपाने वर्षागणिक हा हिशोब पूर्ण होत असतो. त्यामुळे ही संधी बहीण आणि भावाने सोडू नये असे म्हटले जाते. हल्ली रक्षाबंधनाच्या दिवशी भाऊ आपल्याला काय भेटवस्तू देणार याकडे बहिणीचे विशेष लक्ष असते. आध्यात्मिकदृष्ट्या बहिणीने मनात अशी अपेक्षा बाळगल्यास तिला त्याचा अध्यात्मिक लाभ होत नाही. त्यामुळे रक्षाबंधन हे निरपेक्ष भावानेच साजरे व्हायला हवे.

**- नरेश घरत, चेंबूर**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

### कर्जतमधील शारदा शाळेची दमदार कामगिरी ६ खेळाडूंची राष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धेसाठी निवड



**अक्षराज : जयेश जाधव**

**दि.२५, कर्जत (रायगड) :** नुकताच झालेल्या दादर परेल येथे झालेल्या ओपन महाराष्ट्र स्टेट लेवल तायक्कांडो चॅम्पियनशिप स्पर्धा दादर परेल येथे शारदा मंदिरच्या ६ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या सर्व खेळाडूंनी सुवर्ण रौप्य आणि कांस्य पदकांची कमाई करत गोवा येथे होणाऱ्या तायक्कांडो चॅम्पियनशिप स्पर्धेत निवड झाली आहे. शारदा मंदिर च्या खेळाडूंनी यश प्राप्त करून स्वतःचे व शाळेचे नाव उज्वल केले असून या यशस्वी खेळाडूंच्या यशामुळेच रायगड जिल्ह्याला संपूर्ण महाराष्ट्रात प्रथम क्रमांक चे मानकरी ठरवले गेले आहे.या यशस्वी खेळाडूंचे महाराष्ट्र तायक्कांडो असोसिएशनचे अध्यक्ष सुनिल सावंत, साटम सर, सावंत मॅडम, सौरभ सावंत यांनी कौतुक करून राष्ट्रीय स्पर्धेत निवड झाल्याचे जाहीर केले आहे व शुभेच्छा दिल्या. या यशस्वी खेळाडूंच्या यशामागे शारदा मंदिर शाळेचे शारीरिक शिक्षण शिक्षक सौरभ गुरव यांचे मोलाचे प्रशिक्षण लाभले आहे. यामध्ये - १) विहान पेरणेकर - सुवर्ण पदक २) रोनक अंबावणे - सुवर्ण पदक ३) इंदवी पोले - सुवर्णपदक ४) स्वराज पोले - सुवर्ण पदक ५) अथर्व नागे - सुवर्णपदक ६) हर्षवर्धन पोले - रौप्य पदक ७) माही चौहान - रौप्य पदक ८) श्रेयस शिंदे - रौप्य पदक ९) विनंती खडके - कांस्य पदक १०) आर्या भालेराव - कांस्य पदक ११) ध्रुव बडे कांस्य पदक तसेच सेमी इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका अंजली किसवे आणि इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका छाया नगरकर व शिक्षक वृंद यांनी शुभेच्छा दिल्या.

---

### आमदार हुसैन यांच्या वाढदिवसानिमित्त निराधार महिलांना धनादेशाचे वाटप




**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.२५, मिरा भाईंदर :** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे वरिष्ठ उपाध्यक्ष तथा आमदार मुझफ्फर हुसैन जी यांच्या वाढदिवसानिमित्त विरोधी पक्षनेत्या तथा नगरसेविका सय्यद आफरीन मुझफ्फर हुसैन यांच्या पुढाकाराने मीरा भाईंदर महानगरपालिकेच्या माध्यमातून निराधार महिलांना आर्थिक मदतीचे धनादेश वितरित करण्यात आले. हा कार्यक्रम विरोधी पक्षनेत्या सय्यद आफरीन मुझफ्फर हुसैन यांच्या दालनात पार पडला. या उपक्रमाच्या माध्यमातून गरजू व निराधार महिलांना आर्थिक आधार देण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी माजी उपमहापौर नूरजहाँ हुसैन (मम्मी जी) तसेच काँग्रेस पक्षाचे सर्व नगरसेवक व नगरसेविका उपस्थित होते. आमदार मुझफ्फर हुसैन यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात आलेल्या या सामाजिक उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

---

### महाराष्ट्र विद्यालयात सखी सावित्री कार्यक्रम उत्साहात साजरा



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२५, नागपूर :** महाराष्ट्र विद्यालय खापरखेडा येथे सखी सावित्री समितीच्या वतीने आरोग्य, सुरक्षितता विकासाच्या दृष्टीने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सहकार महर्षी बाबासाहेब केदार स्मृती सभागृहात कार्यक्रम उत्साह पूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सखी सावित्री समितीचे सचिव व शाळेचे मुख्याध्यापक अरुण वडस्कर होते. अतिथी म्हणून पर्यवेक्षिका चानीकर मॅडम उपस्थित होत्या. प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा.श्वेता रोकडे यांनी आई आणि मुलीचे मैत्रीचे नाते या विषयावर उत्कृष्ट उदबोधन केले. तसेच या कार्यक्रमाकरिता भारती शरद नागदिवे व तारा नायडू प्राथमिक आरोग्य केंद्र खापरखेडा यांनी सुद्धा मार्गदर्शन केले. चिचोली प्राथमिक आरोग्य केंद्राचे मलेरिया विभाग प्रमुख शरद पवार हे सुद्धा उपस्थित होते.

पालक प्रतिनिधी कविता भोसकर यांनी त्यांचे आपल्या भाषणातून प्रत्यक्ष अनुभव सांगितले. माजी विद्यार्थिनी डॉ.सौ निधी डीबे (भूरकुंडे) अनुभवातून व विचारातून विद्यार्थिनीच्या आरोग्य विषयक समस्या, वैयक्तिक स्वच्छता, व किशोरवयीन मुलीचे आरोग्य अतिशय प्रेरणादायी माहिती दिली. या कार्यक्रमाकरिता महिला पोलीस अश्विनी नौकरकर व जयश्री गजभिये त्यांनी आपली सुरक्षितता कशी करायची? याबद्दल प्रेरणादायी माहिती सांगितली. या कार्यक्रमाला बहुसंख्य प्रमाणात महिला वर्ग विद्यार्थिनीच्या पालक म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निर्मला गिऱ्हे व आभार प्रदर्शन वनिता रेवतकर यांनी केले.

---

### आर.सी. पटेल खर्दे विद्यालयात वार्षिक आरोग्य तपासणी व आरोग्यविषयक मार्गदर्शन



**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.२५, शिरपूर (धुळे) :** आर. सी.पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, खर्दे बु., ता.शिरपूर, जि.धुळे येथे विद्यार्थ्यांसाठी वार्षिक आरोग्य तपासणी व आरोग्यविषयक मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थी आरोग्य तपासणीसाठी जिल्हा उपरुग्णालय शिरपूर येथील डॉ.एस.व्ही. नेरकर तसेच डॉ.रश्मी कामडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. विद्यालयाचे प्राचार्य पी.व्ही.पाटील यांनी विद्यार्थ्यांना वार्षिक आरोग्य तपासणी करण्यामागील हेतू व उद्देश या विषयी माहिती देऊन उपस्थित आरोग्य अधिकारी यांचा परिचय करून दिला.

या प्रसंगी डॉक्टर एस.व्ही.नेरकर यांनी विद्यार्थ्यांना वैयक्तिक स्वच्छता, संतुलित आहार, नियमित व्यायाम, आरोग्यदायी जीवनशैली, स्वच्छतेच्या सवयी आणि विविध आजारांपासून बचाव याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. डॉ.रश्मी कामडे यांनी विद्यार्थिनींना आरोग्याविषयीं कोणती काळजी घ्यावी याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यालयातील इयत्ता पाचवी ते बारावी वर्गातील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. विद्यालयातील वार्षिक आरोग्य तपासणी तसेच मार्गदर्शन कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

---


# दिवा प्रभाग समितीचा बेकायदा बांधकामांवर मोठा ॲक्शन - ५३ हून अधिक इमारतींना नोटीस

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२५, दिवा :** दिवा आणि शिळफाटा परिसरात मोठ्या प्रमाणात उभ्या राहिलेल्या बेकायदेशीर इमारतींवर ठाणे महानगरपालिका, दिवा प्रभाग समितीने कारवाईचा बडगा उगारला आहे. या परिसरातील ५३ पेक्षा जास्त बेकायदेशीर इमारतींना नोटीस देण्याचे काम सध्या प्रभाग समितीकडून युद्धपातळीवर सुरु आहे.

महापालिका सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, या सर्व इमारतींमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५३ व २५४ चे उल्लंघन करून, कोणत्याही प्रकारची बांधकाम परवानगी न घेता तळ + ७ मजल्यापर्यंतची बांधकामे करण्यात आली आहेत.

महापालिकेने यापूर्वीच बांधकाम व्यावसायिकांना कलम २६० अन्वये नोटीस बजावली होती, मात्र कोणतेही अधिकृत कागदपत्रे सादर न केल्याने आता


ठाणे महानगरपालिका, ठाणे
दिवा प्रभाग समिती
साई सृष्टी रेसीडेन्सी, हरिश्चंद्र अपार्टमेंट,पहिला मजला,शिळ रोड,दिवा पूर्व.
Email id- amcdiva@thanecity.gov.in

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अंतर्गत
कलम २६८ (१)(२)(३)(४) अन्वये नोटिस

थेट भोगवटाधारकांवर कारवाईची वेळ आली आहे.

**कलम २६८ अन्वये कारवाई**

सदर सर्व इमारतींना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६८ (१)(२)(३)(४) अन्वये नोटीस बजावण्यात येत आहे. या नोटीसमध्ये

- सदर इमारतीचा भोगवटा व वापर बेकायदेशीर असल्याचे नमूद केले आहे.
- नोटीस मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत इमारत/सदनिका खाली करून ताबा सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत.
- मुदतीनंतरही इमारतीत प्रवेश केल्यास किंवा आदेशाचे उल्लंघन केल्यास कलम २६८ (५) अन्वये पोलीस यंत्रणेच्या मदतीने कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

दिवा प्रभाग समितीच्या या धडक कारवाईमुळे बेकायदा बांधकाम करणाऱ्या बिल्डरांचे धाबे दणाणले असून, स्थानिक नागरिकांमध्ये या कारवाईचे स्वागत केले जात आहे.

---

# दै.अक्षराज बातमीचा इम्पॅक्ट! पालशेत बाजारपेठेतील जीवघेणे खड्डे अखेर बुजवले




दैनिक संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
मुख्य संपादक : विनोद गोरे मोबा.८६०५३१३२०२

पालशेत बाजारपेठेतील रस्त्याची दयनीय अवस्था, जीवघेण्या खड्ड्यांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

अक्षराज : उदय दणदणे
दि.१९, गुहागर (पालशेत) : गुहागर तालुक्यातील पालशेत बाजारपेठेतील मुख्य रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून अत्यंत दयनीय अवस्थेत आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने नागरिकांना आणि वाहनधारकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. बाजारपेठेच्या मध्यभागी, दिपक शिरगांवकर यांच्या किराणा दुकानाजवळ एक प्रचंड आणि जीवघेणा खड्डा निर्माण झाला आहे.
सध्या पावसामुळे या खड्ड्यात चिखल आणि पाणी साचले असून एसटी तसेच खाजगी वाहनधारकांना मार्गस्थ होताना फार मोठी कसरत करावी लागत आहे. सर्वात दुर्दैवी बाब म्हणजे या गंभीर समस्येकडे स्थानिक प्रशासनाचे सातत्याने दुर्लक्ष होत आहे. डोळ्यासमोर धोका असतानाही कोणीही आवाज उठवत नाही, असा येथील नागरिक तीव्र संताप व्यक्त करत आहेत. जनतेच्या जीवाशी खेळ थांबवून पालशेत ग्रामपंचायत आणि शासन प्रशासनाने या रस्त्याच्या आणि खड्ड्यांच्या भीषण समस्येची तात्काळ दखल घ्यावी, अशी मागणी स्थानिक नागरिक, दुकानदार, व्यापारी वर्ग करत आहे. आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पालशेत बाजारपेठेतील खड्डेमय झालेला रस्ता संबंधित बांधकाम विभागाने तात्काळ दुरुस्त करून येथील नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी आता जोर धरत आहे.

नागरिकांच्या प्रतिक्रिया :
पालशेत बाजारपेठेतील हा रस्ता आणि मोठे खड्डे नागरिकांसाठी गंभीर धोका बनले आहेत. प्रशासनाने दुर्घटना होण्याची वाट न पाहता तात्काळ दखल घेऊन रस्त्याची दुरुस्ती करावी. संबंधित ग्रामपंचायत व प्रशासनाने याबत त्वरित कार्यवाही करणे गरजेचे आहे.
- अवधुत पाडावे (पालशेत)
दुर्दैवाची गोष्ट म्हणजे, या गंभीर परिस्थितीकडे ना तिथले स्थानिक लोक लक्ष देत आहेत, ना दुकानदार. सर्वांच्या डोळ्यासमोर हा प्रकार सुरू आहे पण कुणीही काही बोलत नाही. जनतेच्या जीवाशी चाललेला हा खेळ आणि या रस्त्याच्या भीषण समस्येची दखल आता स्थानिक प्रशासन आणि पालशेत ग्रामपंचायतीने तात्काळ घ्यावी.
- विजय शंकर झिंबर (पालशेत)

Main Edition - 20 Aug 2026 - Page 4
Powered By Aksharaj Media

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२५, पालशेत (गुहागर) :** दि.२०ऑगस्ट २०२६ रोजी दैनिक अक्षराज प्रसिद्ध प्रसिद्धी झालेल्या 'पालशेत बाजारपेठेतील रस्त्याची दयनीय अवस्था, जीवघेण्या खड्ड्यांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष' या बातमीची तात्काळ दखल घेण्यात आली आहे.

या बातमीचा मोठा इम्पॅक्ट झाला असून अखेर प्रशासनाला जाग आली आहे.

पंचायत समितीचे सभापती प्रणव पोळेकर यांनी स्वतः पालशेत बाजारपेठेत येऊन पाहणी केली. ग्रामस्थांच्या उपस्थितीत शनिवार दिनांक २२ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री युद्धपातळीवर रस्ता दुरुस्तीचे काम करून बाजारपेठेतील मुख्य रस्त्यावरील सर्व जीवघेणे खड्डे बुजवण्यात आले आहेत. दीपक शिरगांवकर यांच्या दुकानाजवळील जो सर्वात मोठा आणि धोकादायक खड्डा होता, तो पूर्णपणे बुजवण्यात आल्याने व्यापारी आणि वाहनधारकांनी समाधान व्यक्त केले आहे. आगामी गणेशोत्सवापूर्वी रस्ता दुरुस्त झाल्याने नागरिकांतून सभापती आणि प्रशासनाचे आभार मानले जात आहेत,सत्य मांडले तर न्याय मिळतो, हेच या घटनेने पुन्हा सिद्ध झाले.

---

# शिळ- एकता नगर मध्ये १७ वर्षीय तरुणाचे अपहरण?

## कचरा टाकायला गेला आणि परतलाच नाही; आईची पोलिसात धाव

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२५, दिवा (ठाणे) :** दिवा-शिळ रोडवरील एकता नगर परिसरातून एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. सकाळी घरातील कचरा टाकण्यासाठी गेलेला १७ वर्षीय मुलगा रहस्यमयरीत्या बेपत्ता झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी शिळ-डायघर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**काय आहे संपूर्ण घटना?**

फिर्यादी राणी पांडुरंग हातेकर (वय ३८) या नवी मुंबई महानगरपालिकेत कंत्राटी सफाई कामगार म्हणून कार्यरत आहेत. त्या गेल्या ११ वर्षांपासून शिळगावातील एकता नगर, मदिना चाळ परिसरात आपल्या दोन मुलांसह वास्तव्यास आहेत.

त्यांचा मोठा मुलगा गणेश पांडुरंग हातेकर (वय १७ वर्षे ११ महिने) याने



नुकतीच शिळगाव येथील हाशा रामा पाटील कॉलेजमधून बारावीची परीक्षा उत्तीर्ण केली आहे. पुढील शिक्षणासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू असल्याने तो सध्या घरीच होता.

पोलिसांना दिलेल्या जबाबानुसार, दिनांक १४ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास गणेश घराशेजारील नाल्याजवळ कचरा टाकण्यासाठी गेला होता.

**बेपत्ता मुलाचे वर्णन...**
- नाव: गणेश पांडुरंग हातेकर
- वय: १७ वर्षे ११ महिने
- बांधा: सडपातळ, रंग: गोरा, उंची: सुमारे साडे पाच फूट
- चेहरा: उभट, नाक: सरळ, केस: काळे आणि वाढलेले
- घातलेले कपडे: लाल-पांढऱ्या पट्ट्याचा टी-शर्ट, मेहंदी रंगाची ट्रॅक पँट आणि काळी चप्पल
- भाषा: मराठी, हिंदी

मात्र बराच वेळ उलटूनही तो घरी परतला नाही. त्यामुळे आईने प्रथम नाल्याजवळ शोध घेतला, त्यानंतर आजूबाजूच्या परिसरात शोधाशोध केली. नातेवाईकांना आणि त्याच्या मित्रपरिवाराला फोन करून विचारपूस केली असता, त्याच्याबाबत कोणतीही माहिती मिळाली नाही.

अखेर कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी आपल्या मुलाचे अपहरण केले असावे, असा संशय राणी हातेकर यांनी व्यक्त करत शिळ-डायघर पोलीस ठाणे गाठले.

**पोलिसांचा तपास सुरू**

फिर्यादीच्या तक्रारीवरून शिळ-डायघर पोलिसांनी तात्काळ गुन्हा नोंदवून घेतला असून पुढील तपास सुरू केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम पोलिसांकडून सुरू असल्याची माहिती मिळत आहे.

या वर्णनाचा मुलगा कोणाला आढळल्यास किंवा याबाबत काही माहिती मिळाल्यास तात्काळ शिळ-डायघर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

---

# बिना (संगम), भानेगावातील शेती मर्ज व पुनर्वसन प्रश्नावर जिल्हाधिकाऱ्यांची भेट

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२५, नागपूर :** कामठी तालुक्यातील बिना (संगम) व भानेगावातील शेतकऱ्यांच्या शेती मर्ज (जमिनीचे विलीनीकरण) तसेच गावाच्या पुनर्वसनाच्या प्रलंबित प्रश्नाबाबत गावातील शेतकरी व नागरिकांच्या वतीने जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन व चर्चा करण्यात आली.

यावेळी बिना (संगम) व भानेगावातील शेतकऱ्यांच्या शेती मर्जच्या प्रश्नामुळे निर्माण झालेल्या अडचणी, जमिनीच्या नोंदी व हक्कांशी संबंधित बाबी तसेच दोन्ही गावाच्या पुनर्वसनाचा प्रश्न जिल्हाधिकारी यांच्या निर्दर्शनास आणून देण्यात आल्या. सदर प्रकरणाबाबत आवश्यक कागदपत्रे व माहिती सादर करून तातडीने कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली. तसेच वेकोलिच्या खाणकाम व ब्लास्टिंगमुळे बिना (संगम) गावातील घरांना तसेच शाळेच्या इमारतींना भेगा पडल्याची गंभीर बाब जिल्हाधिकारी यांच्या निर्दर्शनास आणून देण्यात आली. गावातील नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी बिना (संगम) व भानेगावाचा दौरा करून पाहणी करावी अशी मागणी यावेळी करण्यात आली.

गावकऱ्यांच्या सर्व समस्या व मागण्या जिल्हाधिकारी यांनी गांभीर्याने ऐकून घेतल्या असून संबंधित प्रकरणावर आवश्यक कार्यवाही करून येत्या १५ दिवसांत प्रकरण मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्यात



येतील असे आश्वासन जिल्हाधिकारी यांनी शिष्टमंडळाला दिले.

शिष्टमंडळात भीवा तांडेकर, राजेश खांडेकर, शंकर केळवदे आणि आकाश चंद्रमणी भिमटे उपस्थित होते. बिना (संगम) व भानेगावातील शेतकरी व ग्रामस्थांच्या शेती, पुनर्वसन आणि सुरक्षिततेशी संबंधित प्रश्नांवर प्रशासनाकडून सकारात्मक व तातडीची कार्यवाही होईल अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.जर प्रशासनाने समाधानकारक भुमिका घेतली नाही तर तीव्र आंदोलन करण्याच्या इशारा दिला.

# ATM मध्ये कार्ड अदलाबदल; पनवेलकरांच्या खात्यातून ५० हजार लंपास

## सुरक्षा व्यवस्थेवर पुन्हा प्रश्नचिन्ह!

**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.२४, पनवेल (नवी मुंबई) :** पनवेल शहरात अढच् कार्डची अदलाबदल करून एका व्यक्तीच्या बँक खात्यातून तब्बल ५० हजार रुपये काढून घेतल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे शहरातील अढच् केंद्रांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, पूर्वीप्रमाणे ATM केंद्रांवर सुरक्षा रक्षक नियुक्त करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.



तक्का, पनवेल येथील रहिवासी हरिश पेग्गु शेट्टी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, २२ ऑगस्ट २०२६ रोजी ते बँक ऑफ महाराष्ट्र, पनवेल शाखेजवळील अढच् केंद्रात पैसे काढण्यासाठी गेले होते. यावेळी ATM् मध्ये व्यवहार करत असताना त्यांच्या मागे उभ्या असलेल्या एका अज्ञात व्यक्तीने संधी साधून त्यांचे अढच् कार्ड बदलल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

शेट्टी यांच्या तक्रारीनुसार, अज्ञात व्यक्तीने त्यांचे मूळ अढच् कार्ड काढून त्याऐवजी दुसरे कार्ड त्यांच्या हातात दिले. मात्र, कार्डची अदलाबदल झाल्याचे त्यांना त्यावेळी लक्षात आले नाही. त्यानंतर २४ ऑगस्ट रोजी दुपारी सुमारे २.१० वाजण्याच्या सुमारास त्यांच्या बँक खात्यातून प्रत्येकी १० हजार रुपयांचे पाच व्यवहार करून एकूण ५० हजार रुपये काढण्यात आल्याचे निदर्शनास आले. हा प्रकार लक्षात येताच त्यांनी पनवेल शहर पोलिसांकडे धाव घेत तक्रार दाखल केली.

सुरक्षा रक्षक नसल्याने फसवणूक करणाऱ्यांना संधी ? पूर्वी अनेक ATM केंद्रांवर सुरक्षा रक्षक तैनात असत. त्यामुळे ATM मध्ये येणाऱ्या-जाणाऱ्या व्यक्तींवर काही प्रमाणात लक्ष ठेवले जात होते. मात्र, सध्या बहुतेक ATM केंद्रांवर सुरक्षा रक्षक दिसून येत नाहीत. त्यामुळे संशयास्पद व्यक्तींना ATM परिसरात मुक्तपणे वावरण्याची संधी मिळत असून, कार्ड अदलाबदल, मदतीच्या बहाण्याने फसवणूक आणि इतर आर्थिक गुन्ह्यांचा धोका वाढत असल्याची नागरिकांमधून चर्चा आहे.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर बँकांनी ग्राहकांच्या सुरक्षेची जबाबदारी अधिक गांभीर्याने घेऊन, पूर्वीप्रमाणे ATM केंद्रांवर प्रशिक्षित सुरक्षा रक्षक नियुक्त करावेत, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. विशेषतः गर्दीच्या आणि संवेदनशील परिसरातील अढच् केंद्रांवर सुरक्षा रक्षकांसह CCTV यंत्रणा कार्यरत ठेवून त्याची नियमित तपासणी करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. या प्रकरणातील आरोपीचा शोध घेण्यासाठी संबंधित ATM केंद्रातील CCTV फुटेज, बँक व्यवहारांची माहिती तसेच ATM परिसरातील इतर सुरक्षाव्यवस्थेची तपासणी करण्यात येणार आहे. CCTV फुटेजमधून आरोपीची ओळख पटण्यास मदत होऊ शकते.

दरम्यान, नागरिकांनी ही ATM वापरताना सतर्क राहण्याची गरज आहे. ATM व्यवहारादरम्यान अनोळखी व्यक्तींवर विश्वास ठेवू नये, कोणालाही PIN क्रमांक सांगू नये, मदतीच्या बहाण्याने जवळ येणाऱ्या व्यक्तींपासून सावध राहावे तसेच व्यवहारानंतर आपले ATM कार्ड योग्य असल्याची खात्री करून घ्यावी. एकीकडे डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन दिले जात असताना, दुसरीकडे ग्राहकांच्या सुरक्षेसाठी ATM केंद्रांवरील प्रत्यक्ष सुरक्षा व्यवस्था मजबूत करणे तितकेच महत्त्वाचे आहे. पनवेलमधील या घटनेनंतर बँका अढच् केंद्रांवरील सुरक्षा व्यवस्थेबाबत गांभीर्याने पावले उचलणार का?

पूर्वीप्रमाणे सुरक्षा रक्षक नेमून ग्राहकांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणार का? असा सवाल आता बँकांसमोर उपस्थित होत आहे.

## थोडक्यात बातम्या

### शहापूरात ठाकरे गटाला 'पॉलिटिकल झटका'; तालुका सचिवलकडे शिवसेनेत

**अक्षराज : सुनिल फर्डे**



**दि.२५, शहापूर (ठाणे) :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शहापूरच्या राजकारणात मोठी राजकीय उलथापालथ झाली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुका सचिव रविंद्र लकडे यांनी उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत तर शिवसेना नेते प्रकाश पाटील, जिल्हाप्रमुख मारुती धिर्डे, तालुका प्रमुख प्रकाश वेखंडे, शहापूर शहर प्रमुख विजय भगत यांच्या माध्यमातून शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.ठाकरे गटाच्या तालुका संघटनेतील महत्त्वाची जबाबदारी सांभाळणाऱ्या लकडे यांच्या पक्षांतरामुळे ठाकरे गटाला मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे. त्यांच्या प्रवेशामुळे शिवसेनेच्या स्थानिक संघटनेला बळ मिळाले असून, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या घडामोडीला विशेष राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. लकडे यांच्या नेतृत्वात यावेळी शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.शहापूर तालुक्यात निवडणुकीपूर्वीच पक्षीय पातळीवर हालचालींना वेग आला असताना लकडे यांचा निर्णय हा ठाकरे गटासाठी आव्हानात्मक ठरण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, या प्रवेशामुळे शिवसेनेला स्थानिक पातळीवर नवे संघटनात्मक बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.निवडणुकीच्या रणधुमाळीपूर्वी झालेला हा 'पॉलिटिकल झटका' शहापूरच्या राजकीय समीकरणांना किती हादरा देतो आणि आगामी निवडणुकीत त्याचे पडसाद कसे उमटतात, याकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# दिवा शहरातील फेरीवाला सर्वेक्षणात गंभीर अनियमितता

## सर्वेक्षण रद्द करून नव्याने करण्याची दिवा मनसेची मागणी

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२५, दिवा (ठाणे) :** दिवा शहरात ठाणे महानगरपालिकेच्या वतीने सुरू असलेल्या फेरीवाला सर्वेक्षणाची प्रक्रिया चुकीच्या व पक्षपाती पद्धतीने सुरू असल्याचा आरोप दिवा मनसेच्या वतीने करण्यात आला आहे. या सर्वेक्षणातील अनियमितता यापूर्वीच व्हिडिओच्या माध्यमातून जनतेसमोर आणल्यानंतर मंगळवार, दिनांक २५ ऑगस्ट २०२६ रोजी दिवा मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी संबंधित महापालिका अधिकाऱ्यांची भेट घेऊन याबाबत जाब विचारला.



मराठी फेरीवाल्यांवर अन्याय होऊ देणार नाही आणि फेरीवाला सर्वेक्षणाच्या नावाखाली कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार होऊ देणार नाही. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी होईपर्यंत दिवा मनसेचा लढा सुरूच राहील.
**– दिवा महाराष्ट्र नवनिर्माण सेना**

फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करताना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झालेली नसतानाही काही फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. दुसरीकडे, मराठी फेरीवाल्यांनी सुमारे २० दिवसांपूर्वी अर्ज व फॉर्म भरूनही त्यांचे सर्वेक्षण अद्याप करण्यात आलेले नाही. मात्र, इतर राज्यांमधून आलेल्या फेरीवाल्यांचे सर्वेक्षण प्राधान्याने केले जात असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सर्वेक्षण प्रक्रियेत मराठी फेरीवाल्यांना डावलून परप्रांतीय फेरीवाल्यांना झुकते माप दिले जात असल्याचा गंभीर संशय निर्माण झाला आहे.

विशेष म्हणजे, महाराष्ट्रातील अधिवासाचा दाखला आवश्यक असताना आतापर्यंत सर्वेक्षण करण्यात आलेल्या फेरीवाल्यांकडून अशा प्रकारचे दाखले घेतले गेले आहेत का, याबाबतही गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. चक्क उत्तर प्रदेशचे रेशनकार्ड जोडलेल्या फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रक्रियेची पारदर्शकता आणि वैधता संशयाच्या भोवऱ्यात आली आहे.

याहून गंभीर बाब म्हणजे, फेरीवाल्यांकडून वसुली करणाऱ्या दलालांना महापालिकेचे कर्मचारी सर्वेक्षण करणाऱ्या कर्मचाऱ्यांसोबत फिरण्यास सांगत असतील, तर प्रत्यक्ष सर्वेक्षण प्रक्रिया किती पारदर्शकपणे होत असेल, याची कल्पना करणे कठीण आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणामध्ये मोठ्या आर्थिक गैरव्यवहाराची किंवा संगनमताची शक्यता नाकारता येत नाही, असा आरोप दिवा मनसेच्या वतीने करण्यात आला आहे.

या सर्व प्रकरणाची ठाणे महानगरपालिका आयुक्तांनी तातडीने सखोल चौकशी करावी, तसेच सर्वेक्षणादरम्यान सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांची तपासणी करावी, अशी मागणी दिवा मनसेच्या वतीने करण्यात आली आहे. तसेच, आतापर्यंत झालेली संपूर्ण फेरीवाला सर्वेक्षण प्रक्रिया रद्द करून, स्वतंत्र व पारदर्शक यंत्रणेच्या माध्यमातून आवश्यक कागदपत्रांची काटेकोर तपासणी करत नव्याने सर्वेक्षण करण्यात यावे, अशी ठाम मागणी दिवा मनसेने केली आहे.

### बोरीच्या घरकुल लाभार्थी मेळाव्यात १ हजार ७०० जणांची नोंदणी

**अक्षराज : जफर शेख**



**दि.२५, बोरी (परभणी) :** जिंतूर तालुक्यातील बोरी येथे ग्रामपंचायत कार्यालयात पालकमंत्री मेघनाताई साकोरे बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा परिषद अध्यक्षा लताताई वाकळे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या घरकुल लाभार्थी मेळाव्यात सतराशे नागरिकांची नोंदणी करण्यात आली आहे, अशी माहिती देण्यात आली. बोरी येथील भाजप नेते सतीशराव चौधरी यांच्या पुढाकारातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जि प अध्यक्षलतताताई वाकळे होत्या. व्यासपीठावर विजयकुमार वाकळे, भाजपा युवा मोर्चा तालुका अध्यक्ष माधवराव दराडे, सतीश राव चौधरी, गट विकास अधिकारी सुभाष मानकर, दीपक भोसले, ग्रामपंचायत अधिकारी आदोडे, शितलताई चौधरी, अंजलीताई कनकुटे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात विजयकुमार वाकळे, माधवराव दराडे, सतीशराव चौधरी यांनी मनोगत व्यक्त केले. हा कार्यक्रम पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली जे लाभार्थी पात्र आहेत. त्यांना या घरकुल योजनेचा लाभ मिळणारच आहे, असे मान्यवरांनी सांगितले. या कार्यक्रमात घरकुल लाभार्थी व वंचित लाभार्थी यांची १ हजार ७०० जणांची नोंदणी झाली असून कागदपत्रे जमा करण्यात आल्याचे ओमकार चौधरी, संभाजी चौधरी, शेख मतीन, विश्वनाथ गोरे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंबादास गजमल यांनी तर आभार प्रदर्शन सुधाकर संगेकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अमृतराव चौधरी, सुभाषराव चौधरी, राजाभाऊ काळेबाग, बिबन शेख, बाबुभाई काझी, दासराव कनकुटे,अशोक शिंपले, ओमकार चौधरी, संभाजी चौधरी, मुंजा गोरे, जावेद लाला, विलास चौधरी,नारायण शिंपले,मंचकराव चौधरी, शेख मतीन, शेख वसीम,बबनराव चौरे, मारोती शिंपले, रामकिशन अंभुरे, दिपक कनकूटे, दिपक प्रधान,विश्वनाथ गोरे,मुसवीर पठाण, वामन शिंपले, तानाजी चौधरी, मुंजा कंठाळे, गणेश बुलबुले, सतीश चौधरी,लोभान खासाब, पाशा कुरेशी, रामा चव्हाण, ज्ञानेश्वर राठोड, संजय शिंपले, परमेश्वर गायकवाड, मधुकर नवघरे आदींनी परिश्रम घेतले.

# भूमि अभिलेख कार्यालयातील बेकायदेशीर वृक्षतोडीवरून वन विभागाने हात झटकले

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२६, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर भूमि अभिलेख कार्यालयाच्या आवारातील सीताफळ, रामफळासह इतर मौल्यवान झाडांची बेकायदेशीर वृक्षतोड केल्याप्रकरणी मनसे तालुका अध्यक्ष अविनाश मुरलीधर पवार यांनी केलेल्या तक्रारीवर वनपरिक्षेत्र अधिकारी पारनेर यांनी अखेर उत्तर दिले आहे. मात्र कारवाई करण्याऐवजी वन विभागाने जबाबदारी नगर पंचायतीवर ढकलली आहे.



**काय आहे प्रकरण?**

दिनांक २१/०८/२०२६ रोजी मनसेकडून वन विभागाकडे लेखी तक्रार अर्ज दाखल करण्यात आला होता की, पारनेर भूमि अभिलेख कार्यालयाच्या आवारातील झाडांची परवानगी नसताना कत्तल करण्यात आली असून, संबंधितांवर तात्काळ गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी.

या तक्रारीच्या अनुषंगाने वनपरिक्षेत्र अधिकारी (जी. व्ही. धाडे) यांनी जा.क्र.कक्ष-१/गुन्हे/७३०/सन २०२६-२७, दिनांक २५/०८/२०२६ अन्वये लेखी कळवले आहे की,

तालुका भूमि अभिलेख कार्यालय पारनेर हे पारनेर नगर पंचायत हद्दीत येत असल्यामुळे नागरी क्षेत्रातील वृक्षतोड अथवा वृक्षासंबंधी कोणतीही कार्यवाही करणे साठी नगर पंचायत कार्यालयातील वृक्षअधिकारी यांचे कडून केली जाते. संबंधित तक्रार अर्जातील वृक्षतोड ही नागरी क्षेत्रात (नगर पंचायत क्षेत्रात) असल्याने या कार्यालयामार्फत कार्यवाही करता येत नाही. तरी आपण संबंधित विभागाकडे योग्य त्या प्रकारे तक्रार दाखल करावी.

**मनसेचा सवाल...**

यावर प्रतिक्रिया देताना मनसे तालुका अध्यक्ष अविनाश पवार म्हणाले की, सरकारी कार्यालयाच्या आवारातच जर अशी बेकायदेशीर वृक्षतोड होत असेल आणि वन विभागच हात झटकत असेल, तर सामान्य माणसाने न्याय मागायचा कुणाकडे? एक विभाग दुसऱ्या विभागाकडे बोट दाखवत आहे. आता हीच तक्रार नगर पंचायत, पारनेर यांच्याकडे दाखल केली असून, नगर पंचायत कारवाई करते की कसे, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

सदर तक्रार अर्ज नगर पंचायत पारनेर येथे आवक लिपिक यांच्याकडे दिनांक २५/०८/२०२६ रोजी दाखल झाला असून, पुढील कार्यवाहीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### घोडणकप्पीच्या घटनेनंतर आरोग्य यंत्रणा दक्ष

### पाटण प्राथमिक आरोग्य केंद्रात सुरक्षित प्रसूती

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.२५, चंद्रपूर :** दुर्गम घोडणकप्पीच्या घटनेनंतर आता आरोग्य यंत्रणा दक्ष झाली असून, आता तेथील इंदिरा रामा जुमनाके यांना यथायोग्य सुविधा पुरविण्यात आली. २३ ऑगस्ट २०२६ रोजी पाटण प्राथमिक आरोग्य केंद्रात या मातेने ३.१ किलो वजनाच्या सुदृढ मुलीला जन्म दिला. आता आई आणि बाळ दोघेही सुखरुप आहे.ग्रामीण आणि दुर्गम भागातील गरोदर मातापर्यंत नियमित आरोग्यसेवा पोहोचविणे हे आरोग्य यंत्रणेसमोरील मोठे आव्हान असल्याचे घोडणकप्पीतील घटनेनंतर पुढे आले. त्यामुळे आता ताकही फुंकून पीत, आरोग्य कर्मचाऱ्यांनी इंदिरा यांच्या गर्भावस्थेच्या सुरुवातीपासून त्यांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष दिले. घरी जाऊन नियमित तपासण्या, रक्तवाढीसाठी आवश्यक इंजेक्शन्स, गोळ्या आणि औषधोपचार देत, त्यांच्या प्रकृतीवर सातत्याने लक्ष ठेवण्यात आले. इंदिरा यांची ही पाचवी गर्भधारणा असल्याने प्रसूतीदरम्यान संभाव्य गुंतागुंत टाळण्यासाठी अधिक दक्षता आवश्यक होती. आई आणि बाळ दोघांची सुरक्षितता लक्षात घेऊन त्यांना १० ऑगस्ट रोजी पाटण प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. पुढील तपासण्यांसाठी १३ ऑगस्ट रोजी त्यांना चंद्रपूर येथे नेण्यात आले. तेथे सोनाग्राफीसह आवश्यक वैद्यकीय तपासण्या करण्यात आल्या. या प्रयत्नांमध्ये इंदिरा त्यांच्या कुटुंबिसांची भूमिका ही मोलाची ठरली. अखेर सर्वांच्या प्रयत्नांना यश आले. २३ ऑगस्ट रोजी पाटण प्राथमिक आरोग्य केंद्र येथे इंदिरा यांची सुरक्षित प्रसूती झाली. त्यांच्या कुशीत ३.१ किलो वजनाची सुदृढ चिमुकली आली. आई आणि बाळ सुखरुप असल्याचे पाहून कुटुंबियांसोबत आरोग्य कर्मचाऱ्यांच्या ही चेहऱ्यावर समाधान उमटले.


*** १५ ऑगस्ट रोजी पालकमंत्र्यांनी घेतली होती भेट ***

१५ ऑगस्ट रोजी राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांच्यासह जिल्हाधिकारी वसुमना पंत, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, व इतर प्रशासकीय अधिकाऱ्यांनी पाटण येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात इंदिरा यांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला होता. तसेच इंदिरा यांच्या आरोग्याची आपुलकीने विचारपूस करीत वैद्यकीय अधिकाऱ्यांना योग्य दक्षता घेण्याच्या सूचनाही केल्या होत्या.

# प्रा.प्रमोद उरकुडे यांना अर्थशास्त्र विषयात पीएच. डी.पदवी प्रदान

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२४, चंद्रपूर :** चंद्रपूर येथील प्रा. प्रमोद वारलुजी उरकुडे यांना गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्याकडून अर्थशास्त्र विषयात' विद्यावाचस्पती' (पीचडी) पदवी प्रदान करण्यात आली. त्यांनी प्रा. डॉ. नितीन बी. कावडकर यांच्या मार्गदर्शनाखाली ' चंद्रपूर जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन- २०१० ते २०२०' या विषयावर संशोधन पूर्ण केले. या संशोधनात शेतकऱ्यांची सामाजिक-आर्थिक स्थिती, उत्पादन विपणनातील समस्या आणि तंत्रज्ञानाचा अभ्यास करण्यात आला असून, हे निष्कर्ष कृषी अर्थव्यवस्थेसाठी उपयुक्त ठरणार आहेत. प्रा. प्रमोद उरकुडे यांनी २०१५ मध्ये अर्थशास्त्र विषयातील सेट परीक्षी उत्तीर्ण केली होती.



डॉ. प्रमोद उरकुडे हे स्थानिक भवानजीभाई चव्हाण कनिष्ठ महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून कार्यरत असून या यशाचे श्रेय त्यांनी आई-वडील, कुटुंबीय, मार्गदर्शक प्रा. डॉ. नितीन बी. कावडकर, डॉ. श्रीकांत पानघाटे, अमोल फुले, पत्नी ज्योत्स्ना उरकुडे, मुलगी क्षितिजा उरकुडे, संस्थेचे व्यवस्थापन मंडळ, प्राचार्य जे. एम. टोंगे व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांना दिले. सर्व मित्रपरिवाराकडून कौतुक केले जात आहे.